राज्यात सद्यस्थितीत सुरु असलेल्या +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांऐवजी राष्ट्रीय व्यवसाय आराखडयाप्रमाणे (NSQF) नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासून सुरु करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : व्हिओसी-२०२३/प्र.क्र. १४ /कौशल्य-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२
दिनांक : २० जुन, २०२३

<u>संदर्भ</u> :- १) केंद्रशासनाचे Extraordinary, Part-१, Section २ Ministry of finance (Department of Economics Affairs) Notification, New Delhi, date २७/१२/२०१३.
२) कौशल्य,रोजगार,उदयोजकता व नाविन्यता विभाग,शासन निर्णय क्र. व्हीओसी-२०१७/प्र.क्र.१५७/व्यशि-४, दि.१०.०५.२०१८
३) संचालनालयाचे पत्र क्र.०८/व्हिओसी/एनएसक्यूएफ/२०२१/४, दिनांक २०/०२/२०२३.
४) संचालनालयाचे पत्र क्र.०८/व्हिओसी/एनएसक्यूएफ/२०२१/४, दिनांक १३/०६/२०२३.

**<u>प्रस्तावना :-</u>**

डॉ.कोठारी आयोगाच्या सन १९६४ च्या शिफारशीनुसार अधिकाधिक युवकांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने सन १९७८-७९ पासून राज्यात व्यवसाय विषयांची ३०% व्याप्ती असलेले, +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यांत आले. सद्यस्थितीत तांत्रिक, वाणिज्य, कृषी व मत्स्य या ४ गटातील एकूण १६ व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत. सदर अभ्यासक्रमांपैकी तांत्रिक गटाचे ३ व वाणिज्य गटाचे ३ अभ्यासक्रम हे १९७९-८० मध्ये,जनरल सिव्हील इंजिनिअरींग हा अभ्यासक्रम सन १९८१ मध्ये, इलेक्ट्रॉनिक्स हा अभ्यासक्रम सन १९९९ मध्ये, कॉम्प्युटर सायन्स हा अभ्यासक्रम सन २००० मध्ये सुधारीत केला आहे. त्यानंतर या अभ्यासक्रमांमध्ये कोणताही बदल करण्यांत आलेला नाही. त्यामुळे सदरचे व्यवसाय अभ्यासक्रम कालबाहय झालेले आहेत. तसेच हे अभ्यासक्रम एन.एस.क्यू.एफ. सुसंगत नाहीत.

केंद्रशासनाच्या वित्त मंत्रालय (आर्थिक कार्य विभाग) यांच्या दिनांक २७/१२/२०१३ रोजीच्या अधिसूचनेनुसार, अधिसूचनेच्या दिनांकापासुन ५ वर्षात सर्व अभ्यासक्रम हे एन.एस.क्यू.एफ. सुसंगत असणे बंधनकारक आहे. त्यानुसार सद्यस्थितीत राज्यात राबविले जाणारे उपरोक्त व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम एन.एस.क्यू.एफ. सुसंगत नसल्याने मुलांना रोजगार-स्वयंरोजगार तसेच उच्च शिक्षणासाठी अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. सध्याच्या बदलत्या तंत्रज्ञानामुळे व शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीकोनातून भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने नॅशनल स्कील क्वालीफिकेशन फ्रेम वर्क (NSQF) विकसित केले असून प्रत्येक स्तरावर ज्ञान व कौशल्य आत्मसात

करावयाचे स्तर ठरवून दिलेले आहेत. त्यानुसार नविन अभ्यासक्रमासाठी मार्गदर्शक तत्वे तयार करण्यांत आलेली आहेत. त्यास अनुसरुन राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व अशासकीय कायम विनाअनुदानित संस्थांमध्ये सुरु असलेले व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम बंद करुन राष्ट्रीय व्यवसाय आराखडयाप्रमाणे (NSQF) नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

राज्यातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत सदयस्थितीत सुरु असणारे व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम बंद करुन राष्ट्रीय व्यवसाय आराखडयाप्रमाणे (NSQF) सोबतच्या **- सहपत्र - अ** मध्ये स्तंभ ३ मध्ये दर्शविण्यात आलेले नवीन अभ्यासक्रम सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व अशासकीय कायम विनाअनुदानित संस्थांमध्ये शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासून सुरु करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. सदयस्थितीत सुरु असणाऱ्या व नवीन व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांची यादी सोबतच्या **सहपत्र- अ** नुसार जोडली आहे.

२. सदयस्थितीत सुरु असणाऱ्या व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांऐवजी नवीन अभ्यासक्रम सत्र २०२४-२५ पासून इयत्ता ११ वी करीता सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व अशासकीय कायम विनाअनुदानित संस्थांमध्ये सुरु करण्यांत यावेत. सदयस्थितीत सुरु असलेल्या अभ्यासक्रमांमध्ये सत्र २०२४-२५ पासून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश करण्यात येवू नये.

३. नवीन व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास इच्छुक असणाऱ्या महाविद्यालयांना या विभागाच्या दि. १० मे, २०१८ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार तसेच शासनाने याबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार सत्र २०२४-२५ पासुन मान्यता देण्याबाबतचे प्रस्ताव व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने शासनास सादर करण्यात यावे,

४. नवीन अभ्यासक्रम राबविण्याकरीता सुधारीत मानके संचालनालयामार्फत निश्चित करण्यांत यावीत.

५. नवीन अभ्यासक्रमांच्या प्रत्येक तुकडीची प्रवेश क्षमता ५० इतकी राहील.

६. **सहपत्र-अ** मधील स्तंभ २ मध्ये दर्शविण्यात आलेल्या व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित संस्थांमध्ये सद्यस्थितीत सुरु असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांस उपलब्ध असलेले शिक्षक व पायाभूत सुविधा यांचा विचार करुन सदर व्यवसाय अभ्यासक्रमांऐवजी **सहपत्र-अ** मध्ये स्तंभ ३ मध्ये दर्शविण्यात आलेल्या अभ्यासक्रमांपैकी नवीन सुरु करावयाचे अभ्यासक्रम व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी निश्चित करावे.

७. ज्या व्यवसाय अभ्यासक्रमांशी सुसंगत जॉबरोल PSSCIVE, भोपाळ यांनी विकसित केलेले नाहीत. अशा अभ्यासक्रमांची यादी **सहपत्र ब** नुसार जोडली आहे. सद्यस्थिती **सहपत्र ब** मधील अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाविद्यालयांना सन २०२४-२५ पासून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश करता येणार नाही. त्यामुळे बंद करण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमांऐवजी **सहपत्र अ** मध्ये स्तंभ-३ मध्ये दर्शविण्यात आलेल्या अभ्यासक्रमांपैकी नवीन अभ्यासकम निवडण्याची संबंधित महाविद्यालयाना मुभा राहील. नवीन अभ्यासक्रमांकरीता मानंकाप्रमाणे आवश्यक कर्मचारी वर्ग व सोयी सुविधा निर्माण करणे महाविद्यालयास बंधनकारक राहील. याबाबतची कार्यप्रणाली संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी निश्चित करावी. प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने संस्थेमधील उपलब्ध असलेले शिक्षक व पायाभूत सुविधा यांचा विचार करुन नवीन सुरु करावयाचे अभ्यासक्रम संचालनालय स्तरावर निश्चित करण्यांत यावेत.

८. व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत सद्यस्थितीत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी शिक्षकांकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व नवीन अभ्यासक्रमांकरीता निश्चित केलेली शैक्षणिक अर्हता यामध्ये तफावत दिसून आल्यास सध्याचे अभ्यासक्रम शिकविण्यासाठी सद्यस्थितीत कार्यरत शिक्षकांनाच आवश्यक ते प्रशिक्षण दिले जावे. सदर प्रशिक्षण देण्याची जबाबदारी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांची राहील. तथापि नवीन शिक्षकांची नियुक्ती करताना संबंधित शिक्षकाने नवीन अभ्यासक्रमाकरीता निश्चित केलेल्या शैक्षणिक अर्हतेची पूर्तता करणे आवश्यक राहील.

९. सदर अभ्यासक्रमाच्या सैध्दांतिक व प्रात्यक्षिक परीक्षांचे नियोजन व आयोजन हे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत करण्यात येईल. सदर विषयांच्या सैध्दांतिक परीक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत व प्रात्यक्षिक परिक्षा महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामार्फत घेण्यात याव्यात.

१०. **सहपत्र अ** मध्ये नवीन अभ्यासक्रमाचा समावेश करणे, कालबाहय अभ्यासक्रम बंद करणे, अभ्यासक्रम अद्ययावत करणे याबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांना असतील.

११. नवीन अभ्यासक्रमांची मानके व इतर अनुषंगिक सुचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०६२०१७५७३०१३०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRINIVAS
JAGANNATH SHASTRI

Digitally signed by SHRINIVAS JAGANNATH SHASTRI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILLS EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=562c9a4a27312e1de46dbbd470c2f1a3e466d159bc4c9bd7f2f9cc64766abce2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C02F19AC7E7AB3A50D817C95CF483E33229CF0CBB03283B175900630F81D2337, cn=SHRINIVAS JAGANNATH SHASTRI
Date: 2023.06.20 17:59:33 +05'30'

**( श्रीनिवास शास्त्री )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव
५) मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव.
६) मा.विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्षनेता यांचे खाजगी सचिव
७) सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य.
८) मा.मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
९) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.
१०) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.
११) प्रधान सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
१२) आयुक्त, शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) संचालक, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
१४) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१५) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण , प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
१६) सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (व्य.शि. व प्र.संचालनालयामार्फत)
१७) निवडनस्ती.

**सहपत्र - अ**

## सदयस्थितीत सुरु असणाऱ्या व नवीन व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांची यादी

| Sr.No. | Existing Vocational Courses | Proposed Revised Vocational Courses<br>(Curricula Developed by PSSCIVE, Bhopal) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | A) Technical Group | |
| १ | Electrical Maintenance | १. Field Technician -Wireman Control Panel<br>(Qualification Pack : Ref. Id. ELE/Q७३०२)<br>२. Lineman Distribution<br>(Qualification Pack: Power - PSS/Q०१०२) |
| २ | Electronics Technology | १. Field Technician-Computing and Peripherals<br>(Qualification Pack: Ref. Id. ELE/Q४६०१)<br>२. Field Technician - Washing Machine<br>(Qualification Pack: Ref. Id. ELE/३१०६) |
| ३ | Scooter & Motor Cycle Servicing | १. Auto Service Technician-L४ / Four-Wheeler Service Assistant<br>(Qualification Pack: Ref. Id.ASC/Q१४०२)<br>२. Auto Service Technician (Two And Three Wheeler) / Two-Wheeler Service Technician<br>(Qualification Pack: Ref. Id. ASC/Q१४११) |
| ४ | Computer Science | १. Junior Software Developer<br>(Qualification Pack: Ref. Id. SSC/Q०५०८)<br>२. Field Technician- Computing and Peripherals<br>(Qualification Pack: Ref. Id. ELE/Q४६०१) |
| ५ | General Civil | १. General Mason/Brick Mason<br>(Qualification Pack: Ref.Id. CON/Q०१०३)<br>२. Construction Painter and Decorator<br>(Qualification Pack: Ref. Id. CON/QP-०५०३) |
| ६ | Mechanical Maintenance | १. Plumber - General<br>(Qualification Pack: Ref. Id. PSC/Q०१०४)<br>२. Agriculture Machinery Operator<br>(Qualification Pack: Ref.Id. AGR/Q११०३) |

| Sr.No. | Existing Vocational Courses | Proposed Revised Vocational Courses |
|---|---|---|
| | **B) Commerce Group** | |
| ७ | Banking | १. Business Correspondent and Business Facilitator (Qualification Pack : Ref. Id. BSC/Q८४०१)<br>२. Distributor Salesman (Qualification Pack : Ref. Id. RAS/Q०६०४) |
| ८ | Marketing Salesmanship | |
| ९ | Office Management | |
| १० | Small Industries & Self Employment | |
| | **C) Agriculture Group** | |
| ११ | Animal Science & Dairy | १. Dairy Farmer/Dairy Entrepreneur (Qualification Pack: Ref. Id. AGR/Q४१०१)<br>२. Small Poultry Farmer (Qualification Pack: REF. ID. AGR/Q४३०६) |
| १२ | Crop Science | १. Organic Grower (Qualification Pack: REF. ID. AGR/Q१२०१)<br>२. Irrigation Service Technician (Qualification Pack : Ref. Id. AGR/Q११०४) |
| १३ | Horticulture | १. Floriculturist (Open Cultivation) (Qualification Pack : Ref. Id. AGR/Q०७०१)<br>२. Gardener (Qualification Pack : Ref. Id.AGR/Q०८०१) |

**सहपत्र - ब**

**ज्या व्यवसाय अभ्यासक्रमांशी सुसंगत जॉबरोल PSSCIVE, भोपाळ यांनी विकसित केलेले नाहीत अशया अभ्यासक्रमांची यादी**

| Sr.No. | Group | Name of the Course |
|---|---|---|
| १ | Technical | Chemical Plant Operator |
| २ | Fishery | Fish Processing Technology |
| ३ | Fishery | Fresh Water Fish Culture |